POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०५ ● अंक-१४२ ● मुंबई, बुधवार, २४ डिसेंबर २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA




## गोरेगावमधील हायप्रोफाईल रॅकेटचा पदार्फाश

### स्पाच्या नावाखाली सर्रास देहविक्रीचा व्यवसाय, सेक्सचे रेट कार्ड

**मसाज सेंटरच्या नावाखाली खुलेआम देहविक्री**

मसाज आणि इतर रेट ठरले तसे बनावट ग्राहकाने व्यवस्थापकाला पैसे दिले, त्याच वेळी बनावट ग्राहकाने पोलिसांना मिस कॉल केला. पोलिसांच्या पथकाने तत्काळ तेथे छापा टाकला. छाप्यादरम्यान स्पाच्या आतील दृश्य पाहून पोलीसही थक्क झाले. खोल्यांची तपासणी केली असता तेथे मोठ्या प्रमाणात आक्षेपार्ह साहित्य सापडले. खोलीच्या आत ठेवलेल्या टेबलावर तेलाच्या बाटल्यांसोबत ह्यडॉटेड स्ट्रॉबेरी फ्लेवरह्चे कंडोमचे बॉक्स मिळाले. पोलिसांनी घटनास्थळावरून कंडोम बॉक्स आणि अनेक वापरलेले कंडोम जप्त केले आहेत. खोल्यांची स्थिती आणि तेथे सापडलेले साहित्य या गोष्टीचा स्पष्ट पुरावा होते की, येथे मसाजच्या नावावर केवळ देहविक्री हाच मुख्य व्यवसाय होता.

**मुलींची रवानगी सुधारगृहात, PITA अंतर्गत गुन्हा दाखल**

पोलिसांनी घटनास्थळावरून स्पाचा कामकाज सांभाळणाऱ्या दोन व्यवस्थापकांना अटक केली आहे. त्यांच्याकडून पोलिसांनी अनेक स्मार्टफोन आणि लॅपटॉपही जप्त केले आहेत, ज्यांचा वापर या अवैध धंद्याच्या संचालनासाठी आणि ग्राहकांशी संपर्क साधण्यासाठी केला जात होता. तपासात हे देखील उघड झाले आहे की, या स्पा कडे व्यवसायाच्या संचालनासाठी कोणतेही वैध दस्तऐवज (वैध कागदपत्रे) नव्हते. पोलिसांनी सर्व मुलींना वाचवून सुधारगृहात पाठवले आहे आणि अटक केलेल्या आरोपींविरुद्ध अनैतिक व्यापार प्रतिबंधक अधिनियम अंतर्गत गुन्हा दाखल करून पुढील कार्यवाही सुरू केली आहे.

■ **बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

गोरेगावमध्ये मसाज पार्लरच्या नावाखाली सुरू असलेल्या एका हाय-प्रोफाइल सेक्स रॅकेटचा पदार्फाश झाला आहे. गोरेगाव पश्चिम येथील एका ४ इमारतीमध्ये सुरू असलेल्या या स्पा सेंटरवर पोलिसांनी छापा टाकून मोठ्या प्रमाणात कंडोमचे पाकिटे, तेलाच्या बाटल्या आणि रोख रक्कम जप्त केली आहे. या छापेमारीदरम्यान पोलिसांनी अनेक मुलींची सुटका केली, ज्यांना मसाजच्या नावाखाली देहविक्रीच्या दलदलात ढकलले गेले होते. तपासामध्ये धक्कादायक बाब समोर आली की, येथे देहविक्रीचे रेटकार्ड ठरलेले होते.

दोन दिवसांपूर्वी पोलिसांना खबरीमार्फत माहिती मिळाली की, एम.जी. रोडवरील एका इमारतीच्या पहिल्या मजल्यावर असलेल्या स्पा सेंटरमध्ये मसाजच्या नावाखाली सेक्स रॅकेट सुरू आहे. या माहितीची खात्री करण्यासाठी पोलिसांनी सापळा रचला आणि एका बनावट ग्राहकाला स्पा मध्ये पाठवले. जेव्हा बनावट ग्राहकाने तेथे उपस्थित असलेल्या मॅनेजरला मसाज आणि सेक्सचे दर विचारले, तेव्हा व्यवस्थापकाने त्याला रेट कार्ड दाखवले आणि मसाजसाठी दोन हजार रुपये, तर मुलीसोबत लैंगिक संबंध ठेवण्यासाठी ४००० रुपये दर सांगितला. म्हणजे एका ग्राहकाकडून दोघांसाठी ६००० रुपयांची मागणी करण्यात आली होती. मॅनेजरने बनावट ग्राहकासमोर चार मुलींना उभे केले, त्यापैकी एकीची निवड करून ग्राहक तिला घेऊन आतल्या केबिनमध्ये गेला.

**पोलीस पोहोचताच मुलींची पळापळ**

पोलिसांच्या छापेमारीदरम्यान स्पा मध्ये एकच गोंधळ उडाला. पोलिसांना पाहताच अनेक मुली गॅलरी आणि स्टाफ रूमच्या दिशेने धावू लागल्या, ज्यांना महिला पोलिसांनी ताब्यात घेतले. चौकशीमध्ये सुटका केलेल्या मुलींनी धक्कादायक खुलासे केले. त्यांनी सांगितले की, व्यवस्थापक ग्राहकांना त्यांच्यासमोर उभे करत असे आणि निवड झाल्यावर त्यांना बंद खोल्यांमध्ये ग्राहकांसोबत शारीरिक संबंध ठेवण्यास भाग पाडले जात असे. ग्राहकांकडून जी मोठी रक्कम वसूल केली जात असे, त्यातील मोठा हिस्सा स्पा मालक आणि व्यवस्थापक आपापसात वाटून घेत असत, तर मुलींना खूप कमी पैसे दिले जात होते. एवढेच नाही तर, जर कोणताही ग्राहक खुश होऊन मुलीला वेगळी टीप देत असे, तर व्यवस्थापक त्यावरही लक्ष ठेवून असत.



## मुंबई हायकोर्टाने पालिका आयुक्त गगराणींना झापलं

### “रस्त्यावर जाऊन बघा, म्हणजे नियम पाळले जात नसल्याचं तुम्हाला समजेल”

मुंबईतील ढासळत्या हवेच्या गुणवत्तेवरून मुंबई उच्च न्यायालयाने पालिकेची खरडपट्टी काढली आहे. आयुक्तांना रस्त्यावर घेऊन जा तेव्हा तुम्हाला समजेल की नियम पाळले जात नाहीत, असे म्हणत मुंबई उच्च न्यायालयाने पालिकेला खडेबोल सुनावले आहेत. मुंबई उच्च न्यायालयाने दखल घेतल्यावर पालिकेला जाग आल्याची टिप्पणी देखील न्यायालयाने केली आहे. तर नियमांचे पालन न करणाऱ्यांवर कारवाई न केल्यास पालिकेवरच कारवाई करण्याचा इशारा मुंबई उच्च न्यायालयाने दिला आहे. मुंबईतील हवेच्या प्रदूषणावरून मुंबई उच्च न्यायालयाने पालिका आयुक्तांना समन्स बजावलं होतं. त्यामुळे मुंबई महापालिका आयुक्त भूषण गगराणी मुंबई उच्च न्यायालयात दाखल झाले होते. न्यायालयाने इटउ आयुक्तांना खडेबोल सुनावत म्हटले की, ₹रस्त्यावर जाऊन बघा, म्हणजे तुम्हाला समजेल की नियम पाळले जात नाहीत.₹ मुंबईतील विमानतळाच्या परिसरासह काही साइट्सवर नियमांचे पालन होत नसल्याचे निरीक्षण न्यायालयाने केले असून, जर महापालिकेने वेळेत कारवाई केली नाही तर तिने स्वतःच कायदेशीर कारवाईला सामोरे जावे लागेल, असे इशारा दिला.

**कामगारांचे आरोग्य आणि मूलभूत अधिकार**

उच्च न्यायालयाने बांधकाम स्थळांवरील कामगारांचे आरोग्य सुरक्षित ठेवण्याबाबतच्या नियमांचे पालन न केल्याबाबत प्रदूषण नियंत्रण मंडळावरही नाराजी व्यक्त केली. न्यायालयाने म्हटले, “कामगारांना गंभीर आरोग्याचे धोके आहेत, तुम्ही गरीबांचे आरोग्याचे हक्क पाळत नाहीत. आरोग्य हा मूलभूत अधिकार आहे.”

**उच्च न्यायालयाने स्वतः स्थापन केलेली समिती**

मुंबईतील हवेच्या ढासळत्या गुणवत्तेवर उपाययोजना करण्यासाठी उच्च न्यायालयाने एक विशेष समिती स्थापन केली आहे, ज्यामध्ये पर्यावरण तज्ञ, आयआयटीचे तज्ज्ञ आणि निवृत्त प्रधान सचिवांचा समावेश आहे. या समितीमार्फत हवेच्या प्रदूषणावर उपाययोजना करण्यात येणार आहेत.

**उद्या पुन्हा सुनावणी**

मुंबई उच्च न्यायालयाने उद्या पुन्हा सुनावणी घेण्याचे ठरवले असून, बीएमसी आणि प्रदूषण नियंत्रण मंडळाने या सुनावणीसाठी तयारी करून उपस्थित राहावे, असे निर्देश दिले आहेत.

## ईव्हीएम मशिनवर उमेदवाराचं नाव झाकलं, ७ कर्मचारी निलंबित, प्रांतलाही नोटीस

■ **भंडारा। प्रतिनिधी,**

राज्यातील नगरपालिका निवडणुकांचे निकाल हाती आले असून आता महापालिका निवडणुकांची रणधुमाळी सुरू झाली आहे. त्यामुळे, नगरपालिका क्षेत्रातील कर्मचाऱ्यांवरील कामाचा ताण कमी झाला असून आचारसंहिता देखील संपुष्टात आली आहे. मात्र, महापालिका क्षेत्रात काम करणाऱ्या प्रशासनावर आता निवडणुकांची जबाबदारी आली आहे.

एकीकडे निवडणुकांचं कामकाज सुरू असताना दुसरीकडे नगरपालिका निवडणुकांवेळी दाखवलेल्या निष्काळजीपणामुळे, बेजबाबदारपणामुळे भंडारा नगरपालिका मतदान केंद्र संदर्भात ७ कर्मचाऱ्यांचे निलंबन करण्यात आलं आहे. तसेच, निवडणूक निर्णय अधिकारी आणि सहाय्यक अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.




भंडारा नगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक ३ मधील एका मतदान केंद्रावरील ईव्हीएम मशीनमध्ये उमेदवाराचं नावं नसल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी भंडारा जिल्हाधिकारी सावन कुमार यांनी मतदान केंद्र प्रमुखासह ७ कर्मचाऱ्यांना काल तडकाफडकी निलंबित केलं. या कारवाईनंतर आता जिल्हाधिकारी सावंत कुमार यांनी या संपूर्ण निवडणूक प्रक्रियेचे प्रमुख असलेल्या निवडणूक निर्णय अधिकारी तथा भंडारा प्रांत अधिकारी माधुरी तिखे आणि सहायक निवडणूक निर्णय अधिकारी (भंडारा नगर पालिका मुख्याधिकारी) जुम्मा प्यारेवाले यांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे.

**ईव्हीएम मशिनवर उमेदवाराचे नाव झाकले**

भंडारा नगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक तीनसाठी असलेल्या मतदान केंद्रावरील ईव्हीएम मशीनमध्ये ५ उमेदवार आणि एक नोटा असे ६ पर्याय असणे आवश्यक होते. मात्र, मतदान केंद्र अधिकारी आणि तेथील कर्मचाऱ्यांनी मतदान यंत्र तयार करताना शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवार करुणा राऊत यांच्या नावासह नोटा हा पर्याय झाकल्या गेला. त्यामुळे प्रत्यक्षात ईव्हीएम मशीनवर ४ उमेदवारांची नावं असल्यानं त्यांनाच मत मिळाली. यात करुणा राऊत यांचं नावं नसल्यानं त्यांना मत मिळाली नसल्याचा आरोप करुणा राऊत यांनी केला आहे. या संपूर्ण प्रकरणाची आणि ईव्हीएम मशीन तपासणी केल्यानंतर मतदान केंद्र प्रमुखासह तेथील ७ कर्मचारी आणि ही संपूर्ण निवडणूक प्रक्रिया राबवण्याची जबाबदारी असलेल्या निवडणूक निर्णय अधिकारी माधुरी तिखे आणि सहाय्यक निवडणूक अधिकारी असलेले जुम्मा प्यारेवाले यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.

## किडनॅपरची अफवा... बुरखा घातलेल्या व्यक्तीला पाहताच...



**नेमकं काय घडलं?**

पोलिसांनी तपास सुरू करताच, तौसिफचा अपहरणाशी काहीही संबंध नसून, परिसरात देखील केवळ अफवा पसरल्या आहेत हे समोर आले. पोलिसांनी स्पष्ट केले आहे की, या प्रकरणात अपहरण किंवा कोणत्याही गुन्ह्यात त्याचा सहभाग असल्याचे कोणतेही पुरावे नाहीत. तसेच परिसरात अशी कोणतीही टोळी सक्रिय असल्याच्या अफवा पूर्णपणे निराधार असल्याचेही पोलिसांनी सांगितले. अधिकाऱ्यांनी नागरिकांना इशारा दिला आहे की, अप्रमाणित माहिती किंवा अफवा पसरवल्यास गंभीर परिणाम होऊ शकतात आणि निरपराध व्यक्तींना इजा पोहोचू शकते. ही सर्व घटना सीसीटीव्ही कॅमेरामध्ये कैद झाली असून, त्यामध्ये नागरिक तौसिफला मारहाण करताना स्पष्ट दिसून येत आहे. सोशल मीडियावर पसरलेल्या या अफवेमुळे नागरिकांनी एका निर्दोष व्यक्तीवर संशय घेतला होता.

■ **मुंबई । प्रतिनिधी,**

विक्रोळीच्या पार्कसाईट परिसरात सोमवारी सकाळी एका व्यक्तीला लहान मुलांचे अपहरण करणारा गुन्हेगार समजून बेदम मारहाण करण्यात आली. परिसरात एक चोर बुरखा घालून, लहान मुलांचे अपहरण करतो आहे अशी अफवा पसरली होती. त्यामुळे एका रिक्षाचालकाला तो चोर समजून नागरिकांनी मारहाण केली. ही घटना सीसीटीव्हीमध्ये कैद झाली असून, त्याचा व्हिडिओ समोर आला आहे. तौसिफ मोहम्मद शेख असे या चालकाचे नाव असून तो याच परिसरातीलच रहिवासी आहे. दोन दिवसांपूर्वी त्याने पार्कसाईट परिसरात तीन प्रवाशांना त्याच्या रिक्षातून सोडले होते. मात्र, त्यावेळी त्या तिघांमध्येही भाडे भरण्यावरून वाद झाला. नंतर, तिघेपण रिक्षाचालकाचे भाडे न देताच तिथून निघून गेले. शेखने पोलिसांना दिलेल्या माहितीनुसार, त्या प्रवाशांचा शोध घेताना ओळख लपवण्यासाठी त्याने बुरखा घातला होता. मात्र परिसरात पसरलेल्या लहान मुलांच्या अपहरणाच्या अफवांमुळे बुरखा घातलेला व्यक्ती दिसताच नागरिकांनी त्याला पकडून मारहाण केली आणि नंतर पोलिसांच्या ताब्यात दिले.

**८ महिन्यांत साडेसात कोटींचा मद्यसाठा जप्त**

राज्य उत्पादन शुल्क नाशिक विभागाने (एक्साईज) अवैध व विक्रीसाठी प्रतिबंधित असलेला मद्यसाठा वाहतूक व बाळगणाऱ्यांवर कारवाई केली आहे. एक्साईज एप्रिल ते नोव्हेंबरमध्ये तब्बल ७ कोटी ५५ लाख ७० हजार ७४ रूपयांचा अवैध मद्यसाठा जप्त केला आहे. एप्रिल २०२४ ते मार्च २०२५ या कालावधीत एक्साईजने ५ कोटी ३७ लाख ३७ हजार ६९४ रूपयांचा मद्यसाठा जप्त केल्याची माहिती एक्साईजच्या नाशिक विभागीय कार्यालयाकडून देण्यात आली. नाताळ, थर्टी फर्स्ट व महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पोलिसांसह राज्य उत्पादन शुल्क विभाग सज्ज झाला आहे. पथकांकडून छापासत्र सुरु असून, अवैध मद्यसाठा जप्त केला जात आहे. नाशिकमध्ये गोवासह परराज्यातून अवैध मद्यसाठ्याची तस्करी केली जाते. यामध्ये दमण, दीव, पंजाब राज्यातून विक्रीसाठी प्रतिबंधित असलेला मद्यसाठा विक्रीसाठी आल्याचे समोर आले आहे. राज्य उत्पादन शुल्क नाशिक विभागाने पथकांमार्फत गस्त वाढवली आहे. शिवाय, खबऱ्यांचे नेटवर्क व अधिकाऱ्यांनी कर्मचाऱ्यांना विश्वासात घेत छापासत्र सुरू केले आहे. त्यामुळे गेल्या ८ महिन्यांत उच्चांकी मद्यसाठा जप्त करण्यात आलेला आहे. ह्यएक्साईजह्ने २०२३-२४ मध्ये २ हजार ४७६ गुन्हे दाखल केले असून, ७ कोटी ५२ लाख रूपयांचा मद्यसाठा व वाहने जप्त केली आहेत.

**असा आहे जप्त मद्यसाठा (लिटरमध्ये)**

- देशी दारू १७ हजार ४०० परराज्य मद्य ३६ हजार ७४०
- हातभट्टी २२ हजार ३०० लिटर रसायन २ लाख ५४ हजार

## थर्टी फर्स्टआधी लाखो रूपयांचा मद्यसाठा जप्त



■ **नाशिकरोड,। प्रतिनिधी,**

नवीन वर्षाच्या स्वागतासाठी परराज्यातून होणाऱ्या बेकायदेशीर मद्यतस्करी रोखण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागाने छापासत्र सुरू केले आहे. दलपतपूर (ता. त्र्यंबकेश्वर, जि. नाशिक) या ठिकाणी केलेल्या धडाकेबाज कारवाईत विभागाने तब्बल १४८ लाख रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. या रॅकेटमधील वाहनचालकाला ताब्यात घेतले आहे. वाहनचालक मयूरभाई भगुभाई पटेल (वय ३३, रा. सिंदाई ता. वाझदा जि. नवसारी, गुजरात) असे ताब्यात घेतलेल्याचे नाव आहे.

राज्य उत्पादन शुल्क ड विभागाच्या अधिकाऱ्यांना सोमवारी (दि.२२) ठाणापाडा- हरसुल रोड लगत, यशंवत ढाबा समोर, दलपतपूर शिवार, दलपतपूर (ता. त्र्यंबकेश्वर, जि. नाशिक) मार्गे नाशिक येथे अवैध मद्याची वाहतूक होणार असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पथकाने सापळा रचून संशयित वाहनांची तपासणी केली. पथकास एका चारचाकी हुंडाई कंपनी निर्मित आय २० वाहनामध्ये दमण दिव व दादरा नगर हवेली येथे विक्रीस असलेला व महाराष्ट्रात प्रतिबंध असलेला मद्यसाठी आढळून आला. पथकाने विविध बॅण्डचे विदेशी मद्याचे ७३ बॉक्स, ४ बनावट नंबरप्लेट जप्त केल्या.

वाहनचालक मयूरभाई भगुभाई पटेल याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मद्दसाठा आणि वाहन व दोन मोबाईल असा एकुण १४ लाख १०० रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. पुढील तपास निरीक्षक गोसावी करीत आहेत.

## शहरात ड्रग्जची चोरीछुप्या विक्री सुरुच... नवे ड्रग्ज पेडलर्स सक्रिय

■ **नाशिकरोड,। प्रतिनिधी,**

शिवाजीनगर येथील एका बंगल्यातून आणि व्दारका परिसरातील हॉटेलमधून ड्रग्ज जप्त केल्याची ताजी घटना असतानाच अंमली पदार्थविरोधी पथकाने इंदिरानगर येथेही दोन तरुणांकडून एमडी ड्रग्ज जप्त केले. पथकाने दोघांना अटक केली असून, त्यांच्याकडून ४० हजारांचे ८ ग्रॅम वजनाचे एमडी ड्रग्ज व इतर साहित्य असा एकूण १ लाख ७५ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.

रोहन बिपीन गोठी (१८, रा. शिवराम बिल्डींग, किशोर नगर, राणेनगर, नाशिक), समीर अमोल वानखेडे (१८, महाकाली चौक, सिडको) अशी अटक केलेल्या संशयितांची नावे आहेत.

अंमली पदार्थविरोधी पथकाच्या प्रभारी वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुशिला कोल्हे यांना गुरूवारी (दि.१८) दोन तरुणांकडे ड्रग्ज असून, ते विक्रीसाठी जाजू शाळेसमोरील मोकळ्या मैदानामध्ये, राणेनगर येथे येणार



असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पथकाने सापळा रचून दोघांना ताब्यात घेतले. पथकाने त्यांच्याकडून ८ ग्रॅम एमडी, इतर साहित्या असा एकूण एक लाख ७५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी पोलिसांनी दोघांविरुद्ध इंदिरानगर पोलीस ठाण्यात ह्यएनडीपीएसह्ल कायद्यान्वये गुन्हा दाखल केला आहे. ही कामगिरी आयुक्त संदीप कर्णिक, उपायुक्त चव्हाण, एसीपी संदीप मिटके यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुशिला कोल्हे, सहायक पोलीस निरीक्षक सचिन चौधरी, विशाल पाटील, सहायक पोलीस उपनिरीक्षक रंजन बेंडाळे, देवकिसन गायकर, संजय ताजणे, हवालदार भारत डंबाळे, नाईक सौंदाणे, अंमलदार गणेश वडजे, बाळासाहेब नांद्रे, योगेश सानप, चंद्रकांत बागडे, अविनाश फुलपगारे यांनी केली.

**बेरोजगारीमुळे दोघे आले ड्रग्ज विक्रीत**

संशयित रोहन बिपीन गोठी, समीर अमोल वानखेडे हे दोघे बेरोजगार आहेत. झटपट श्रीमंतीसाठी दोघांनी गुन्हेगारीचा मार्ग निवडल्याचे पोलीस तपासात समोर आले आहे.

**पोलिसांना एमडीचे रॅकेट समूळ नष्ट करण्याचे आव्हान**

अंमली पदार्थविरोधी पथकाने केलेल्या कारवाईतून नाशिक शहरात अजूनही एमडी ड्रग्जची चोरीछुप्या विक्री सुरुच असल्याचे शिक्कामोर्तब झाले आहे. शहर पोलिसांनी काही महिन्यांपूर्वी एमडी ड्रग्जचे रॅकेट उद्ध्वस्त करत परजिल्ह्यातील कारखानेही बंद पाडले. तरीही, एमडी विक्रीवर अद्याप आळा बसू न शकल्याने पोलिसांसमोर एमडीचे रॅकेट समूळ नष्ट करण्याचे आव्हान आहे.



**समृद्धी महामार्गावर 'पुष्पा'सदृश थरार**

इगतपुरी व सिन्नर वन परिक्षेत्र अधिकारी कार्यालयाच्या पथकाच्या नाकावर टिच्चून वन मुख्यालयातील दक्षता पथकाने समृद्धी महामार्गावर तब्बल पन्नास किलोमीटर तस्करांचा पाठलाग केला आणि अवैध लाकूड वाहतूक रोखली. सिन्नर ते इगतपुरी दरम्यान रंगलेल्या सिनेस्टाइल थरारादरम्यान वन पथकाने चाळीस टन लाकडासह तीन ट्रक असा ३६ लाखांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गावरून भारतीय वृक्षांच्या लाकडाची चोरटी वाहतूक होणार असल्याची माहिती वन विभागाच्या दक्षता पथकाला मिळाली. त्याआधारे गोंदे (सिन्नर) येथे सापळा रचण्यात आला. यात आंबा, निम, वड, पिंपळ अशा भारतीय प्रजातीच्या वृक्षांची चाळीस टन लाकडे तसेच तीन ट्रक (एमएच १७ बीझेड ९८७२, एमएच १७ बीवाय ७६५३, एमएच ०४ इएल १८४२) जप्त करण्यात आले. संशयित जाकीर तांबोळी, वसीम फकीर महसूद, शेख सोहेल अनिस तसेच (चालक), फहरान निसार शेख, परवेज शेख, सलील खान बुडनर खान पठाण (गाडीमालक) यांच्याविरोधात गुन्हा नोंदविण्यात आला. दक्षता विभागाचे विभागीय वनाधिकारी अजित साजणे यांच्या मार्गदर्शनाखाली वनपरिक्षेत्र अधिकारी पुष्पा सातारकर, उस्मान सय्यद, हर्षल कोमटे, पवार, चव्हाण, आवारी यांच्या पथकाने कारवाई केली.

## पनवेल स्थानकातील धक्कादायक प्रकार

### माथेफिरुने धावत्या लोकलमधून महाविद्यालयीन तरुणीला ढकलले

■ **नवी मुंबई। प्रतिनिधी,**

लोकलमधील महिलांच्या डब्यात चढलेल्या एका व्यक्तीला महिलांनी हटकल्याने सदर व्यक्तीने १८ वर्षीय महाविद्यालयीन तरुणीला धावत्या लोकलमधुन ढकलून दिल्याची धक्कादायक घटना गुरुवारी सकाळी पनवेल ते खांदेश्वर रेल्वे स्थानकादरम्यान घडली. या घटनेत सदर तरुणी जखमी झाली आहे. रेल्वे पोलिसांनी या घटनेतील आरोपी व्यक्तीला तत्काळ स्थानकात खांदेश्वर रेल्वे प्रवाशांच्या मदतीने अटक केली आहे.

या घटनेतील जखमी झालेल्या तरुणीचे नाव श्वेता संजय महाडीक असे असून ती नवीन पनवेलला राहते. ही तरुणी खारघर येथील सरस्वती इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजीमध्ये अभियांत्रिकीचे शिक्षण घेत आहे. १८ डिसेंबरला सकाळी श्वेताने कॉलेजमध्ये जाण्यासाठी सकाळी ७.५९ ची पनवेल-सीसएमटी लोकल पकडली होती. यावेळी तिच्यासोबत तिची मैत्रीण होती. यावेळी महिलांच्या डब्यात शेख अख्तर नवाज हा चढला.

महिला प्रवाशांनी त्याला जाब विचारला असता, त्याचा वाद झाला. याच रागाच्या भरात त्याने धावत्या लोकलमधून श्वेताला अचानक पाठून जोराचा धक्का दिला. यामुळे श्वेता धावत्या लोकलमधून खाली रेल्वे



रुळावर पडली. सुदैवाने तिचा जीव वाचला. मात्र तिच्या डोक्याला, कंबरेला आणि हातापायाला गंभीर दुखापत झाली आहे. श्वेताने रेल्वे रुळावर काम करणाऱ्या कामगारांच्या मदतीने वडिलांना संपर्क साधुन घडल्याप्रकाराची माहिती दिली. त्यानंतर वडिलांच्या मदतीने श्वेताने रुग्णालय गाठले.

दरम्यान, आरोपीने खांदेश्वर रेल्वे स्थानकातून पळून जाण्याचा प्रयत्न केला, मात्र डब्यातील महिला प्रवाशांनी घटना घडल्यानंतर तत्काळ रेल्वे पोलिसांना घडल्या प्रकाराची माहिती दिली असल्याने रेल्वे पोलिसांनी तत्परता दाखवत प्रवाशांच्या मदतीने त्याला खांदेश्वर स्थानकात ताब्यात घेतले. त्यानंतर पनवेल रेल्वे पोलीस ठाण्यात त्याच्या विरोधात विविध गुन्हे दाखल झाले आहेत. न्यायालयाने त्याला ३ दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे. अशी माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय तायडे यांनी दिली.



संपादकीय

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# अरुणाचल प्रदेशासाठी धोका!




अरुणाचल प्रदेशामध्ये नुकतेच हेरगिरीचे जाळे उघड झाले आहे. पोलिसांनी गत १० दिवसांत पाकिस्तानशी संबंधित हेरगिरी ‘नेटवर्क’मधील ४ संशयितांना अटक केली. हे सर्व संशयित महत्त्वाची माहिती पाकिस्तानी ‘हँडलर्स’ना पाठवत होते. यामध्ये महत्त्वाचे म्हणजे चीनचाही या नेटवर्कमध्ये सहभाग असल्याचे लक्षात आले आहे. पकडले गेलेले संशयित स्थानिक मुसलमान समुदायांमध्ये मिसळून ‘स्लीपर सेल’ सिद्ध करण्याचा प्रयत्न करत होते. यामध्ये काही बांगलादेशी मुसलमानांचाही सहभाग असल्याची माहिती आहे. हेरगिरी नेटवर्क उघड होण्यास प्रारंभ ११ डिसेंबर या दिवशी इटानगर येथून जम्मू-काश्मीर येथील निवासी २ धर्मांधांना अटक करण्यात आल्यावर झाला. ते ‘एन्क्रिप्टेड टेलिग्राम चॅनल’द्वारे पाकिस्तानी हँडलर्सच्या संपर्कात होते. १३ डिसेंबर या दिवशी काश्मीर येथील आणखी २ तरुणांना पकडण्यात आले. अन्वेषणात हे नेटवर्क आसामपर्यंत पसरले असल्याचे संकेत मिळाले. तेजपूर येथून वायूसेनेचे निवृत्त अधिकारी कुलेंद्र शर्मा यांनाही याच साखळीशी जोडले जात आहे. एकूणच ‘ईशान्य भारतात काहीतरी मोठे करण्याच्या प्रयत्नात पाकिस्तान, चीन आणि त्यांच्या समवेत आता बांगलादेशही आहे’, असे या घडामोडींवरून लक्षात येते. अरुणाचल प्रदेशवर चीनचा नेहमीच डोळा राहिला आहे. चीन अरुणाचल प्रदेशला स्वतःचा भाग मानतो, हे अनेक वेळा उघड झाले आहे. काही दिवसांपूर्वी चीनमध्ये खेळांच्या निमित्ताने गेलेल्या अरुणाचल प्रदेशामधील खेळाडू तरुणीला ‘इमिग्रेशन’च्या अधिकाऱ्यांनी अनुमाने १८ घंटे विमानतळावर थांबवून ठेवले होते. त्या तरुणीकडे अरुणाचल प्रदेशाचे भारतीय ओळखपत्र होते, एवढीच तिची चूक! यापूर्वीही अरुणाचल प्रदेशातील कुणी व्यक्ती चीनमध्ये गेल्यावर तेथे तोच अनुभव आला होता. एवढेच नाही, तर अरुणाचलमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा दौरा आणि विदेशी मंत्र्यांचे दौरे आयोजित करण्यावरही चीनने केवळ आक्षेप घेतला नाही, तर निषेधही व्यक्त केला होता. म्हणजे चीनची केवढी मजल जाते पहा! काही दिवसांपूर्वी भारताला ईशान्य भारताशी जोडणाऱ्या ‘चिकन नेक’जवळील बांगलादेशाच्या भूभागावर त्यांच्या वायूसेनेचा हवाईतळ चीन बांधत आहे. त्यासमवेत चीन बांगलादेशाच्या पेकुआ येथे ८ पाणबुड्यांसाठीही तळ बांधत आहे. चीनने बांगलादेशाला २ पाणबुड्याही दिल्या आहेत, म्हणजे चीनचा थेट हस्तक्षेप बांगलादेशात चालू आहे आणि त्याद्वारे भारतावर कुरघोडी करण्याचा चीनचा प्रयत्न आहे. बांगलादेशाच्या वैमानिकांना पाकिस्तान प्रशिक्षित करणार आहेच, त्यासमवेत सैन्यालाही प्रशिक्षण देणार आहे. कोलकाताजवळील बांगलादेशातील बंदरही चीन विकसित करणार आहे. नुकतेच बांगलादेशात ईशनिंदेच्या आरोपाच्या नावाखाली दीपू चंद्र दास या हिंदु तरुणाला जिवंत जाळण्यात आल्याची घटना घडली. तेथील एक भारतविरोधी धर्मांध नेता शरीफ उस्मान हादी याच्या मृत्यूनंतर हिंदूंवर आक्रमणे करण्यात येत आहेत आणि त्या नेत्याची बहीण आता ‘हिंदूंचे अस्तित्व संपवून टाकू’, असे धमकावत असल्याचे व्हिडिओ प्रसारित झाले आहेत. हादीचे व्हिडिओ किंवा त्याची विधाने यात ‘भारतातील ईशान्येकडील ७ राज्ये, तसेच बंगाल आणि बिहार यांना एकत्र करून ‘ग्रेटर बांगलादेश’ बनवू’, अशा फुशारक्या मारल्या आहेत. त्यामुळे त्याचा अज्ञाताने ‘गेम’ केल्याचे म्हटले जात आहे. हादी याचे विधान येथे उद्धृत करण्याचे कारण म्हणजे त्याच्यासारख्या बांगलादेशी नवख्या तरुण धर्मांध नेत्यांचाही ईशान्य भारतावर डोळा आहे. ही सर्व सूत्रे येथे मांडण्याचे कारण म्हणजे पाक, चीन आणि बांगलादेश यांची धोकादायक युती झाली असून त्याद्वारे भारतातील अरुणाचल प्रदेश आणि सीमावर्ती भागातील गोपनीय माहिती एकत्र करण्यात येत आहे. या माहितीचा उपयोग करून भारताच्या सीमावर्ती भागात घातपाताची योजनाच सिद्ध केली जात असल्याचे उघड आहे. काही दिवसांपूर्वी बांगलादेशाच्या अंतरिम सरकारचे प्रमुख सल्लागार महंमद युनूस यांनी ‘भारताच्या ‘सिलिगुडी कॉरिडॉर’साठी बांगलादेशाचेच संरक्षण आहे’, असे विधान केले होते. त्यातून त्यांनी भारताला सूचक धमकी दिली होती. ती म्हणजे बांगलादेश, पाक आणि चीन यांचा भारत हा एक सामायिक शत्रू आहे, त्यातील २ मुसलमान देश आहेत, तर एक साम्यवादी! म्हणजे दोघेही तसे हिंदु आणि भारतविरोधी मानसिकतेचे आहेत. अरुणाचल प्रदेशातील स्थानिकांच्या मते, चीनने वर्ष २०२४ पासून सीमावर्ती जिल्ह्यांमध्ये ६० कि.मी.च्या परिसरात सैन्याचे कँप उभारले आहेत, त्यासमवेत मॅकमोहन रेषेपासून आत ४० कि.मी. अंतरावर ३६ विमान निवारेही बांधल्याची माहिती आहे. हेरगिरी करणारे नेटवर्क उघड झाल्यावर भारताने वेगाने पावले उचलत आसाम, अरुणाचल प्रदेशासह ईशान्येकडील अन्य राज्यांमध्ये शोधमोहीम तीव्र केली आहे. भारतीय सुरक्षा यंत्रणा त्यांची कामगिरी पार पाडत असल्या, तरी चीनच्या कुरापती थांबण्याची काही चिन्हे नाहीत. पंतप्रधान नरेंद्र मोदी काही महिन्यांपूर्वी ‘ब्रिक्स’ देशांच्या संमेलनाच्या निमित्ताने चीनमध्ये जाऊन चीनच्या राष्ट्राध्यक्षांशी खेळीमेळीने संवाद साधत असले आणि ‘मैत्रीपूर्ण संबंध होऊ शकतात’, असे वाटत असले, तरी चीन हा कपटी आणि धूर्त असण्यासह साम्राज्यवादी मानसिकतेचा देश आहे. चीनचे त्याच्या शेजारी असलेल्या अनेक देशांशी सीमावादाचे प्रश्न चालू आहेत. भारताच्या काश्मीरचा मोठा भूभागही चीनने गिळंकृत केला आहे. तो भारताला अजूनही सोडवता आलेला नाही. भारताची परीक्षा पहाण्यासाठी चीन जाणीवपूर्वक डोकलाम, गलवान यांसारखे विषय उकरून काढतो आणि सीमेवर तणाव निर्माण करतो. त्यामुळे अरुणाचल प्रदेशावर दावा सांगणाऱ्या चीनला सीमाप्रश्नी थोडा हिसका दाखवणे आवश्यक आहे. तिबेट, हाँगकाँग हे चीनसाठी त्रासदायक विषय भारताने हाती घेतले पाहिजेत. चीनकडे काश्मीरचा भूभाग परत मागणे आणि प्रसंगी सैन्य कारवाई केल्यास चीनसह फुटकळ बांगलादेश अन् पाक यांनाही जोरदार संदेश जाऊ शकतो. अरुणाचल प्रदेशामध्ये केंद्रशासनाचे कार्यक्रम, सैन्याचा युद्धाभ्यास हे चीनला स्पष्ट संदेश देणारे कार्यक्रमही केले पाहिजेत. इस्लामी कट्टरतावादी पाकसह बांगलादेशही भारताला वाकुल्या दाखवत आहे. पाक आणि बांगलादेश या दोन्ही देशांची निर्मिती भारतातूनच झाली आहे. सर्व प्रदेश हा भारतीय भूभागच होता. हा भूभाग भारतविरोधी कारवायांचा मंच बनला, तर तो वारंवार भारतात आतंकवादी कारवाया करणाऱ्या आतंकवाद्यांचे निवास बनेल. पूर्वी घोरी, गझनी इत्यादी मोगल आक्रमक भारतावर चाल करून यायचे आणि पुष्कळ हिंसाचार करायचे. त्याची पुनरावृत्ती टाळायची असेल, तर भारताला पाकसह बांगलादेशावर सैन्य कारवाई करणे आवश्यक बनले आहे.

# आजचा महाराष्ट्र ड्रग माफियांच्या सावलीत





**महाराष्ट्रात अंमली पदार्थांचा वाढता विळखा, राजकीय संरक्षण आणि निष्क्रिय प्रशासन यामुळे तरुणाई, लोकशाही व राज्याचे भविष्य धोक्यात आले असून वेळेत कठोर कारवाई न केल्यास महाराष्ट्र ‘उडता महाराष्ट्र’ बनेल का... ?**

नेटफ्लिक्सवरील ‘नार्कोस’ ही सिरीज आपल्यापैकी अनेकांनी पाहिली आहे. दक्षिण अमेरिकेतील कोलंबिया देशावर पाब्लो एस्कोबार या कुख्यात ड्रग माफियाने कसे नियंत्रण मिळवले, याचे चित्रण यात दर्शवलेले आहे. ड्रग्सच्या व्यापारातून मिळवलेल्या पैशाच्या जोरावर एस्कोबारने राजकारणी विकत घेतले, पोलीस यंत्रणा पंगू केली, न्यायाधीश, पत्रकार आणि प्रामाणिक अधिकाऱ्यांच्या हत्या करून संपूर्ण व्यवस्थेलाच दहशतीखाली ठेवले. परिणामी, कागदोपत्री सरकार अस्तित्वात असले तरी प्रत्यक्षात एस्कोबार आणि त्याचे मेडेलिन कार्टेलच देश चालवत होते.

आजच्या महाराष्ट्राकडे पाहिले, तर हा इतिहास आणि नार्कोसमध्ये दाखवलेली परिस्थिती आपल्या आजूबाजूला उभी राहत आहे का? असा प्रश्न अस्वस्थ करतो. वर्ध्यापासून सातारा ते रत्नागिरी-सिंधुदुर्गपर्यंत, धाराशिवपासून उत्तर महाराष्ट्रातील धुळेझनंदुरबारपर्यंत रोज कुठे ना कुठे अंमली पदार्थांचे कारखाने, विक्री करणारे सापडत आहेत. संपूर्ण महाराष्ट्राला या विषारी व्यापाराने घट्ट विळखा घातल्याचे भीषण चित्र आहे.

**अंमली पदार्थांचे ह्यमेक इन महाराष्ट्रह्म**

राज्यात भाजपचे सरकार आल्यानंतर ‘मेक इन महाराष्ट्र’ सोहळ्याचे आयोजन सरकारने केले होते. राज्यात मोठ्या प्रमाणात उद्योग येतील. कारखाने सुरु होतील आणि तरुणांना रोजगार मिळतील, असे सरकारने सांगितले होते. ते कारखाने आले नाहीत, रोजगार मिळाला नाही पण सत्ताधारी पक्षाच्या जवळच्या लोकांनी बांग्लादेशातून कामगार आणून राज्यात अंमली पदार्थांचे कारखाने मात्र सुरु केले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सातारा जिल्ह्यातील दरे गावापासून हाकेच्या अंतरावर असलेल्या सावरी गावात एमडी या घातक अंमली पदार्थाच्या निर्मितीचा कारखाना सुरु होता. मुंबई पोलिसांनी धाड घालून केलेल्या कारवाईत १५० कोटी रुपयांचे अंमली पदार्थ आणि त्यासाठी लागणारे साहित्य जप्त करण्यात आले. या कारखान्यात काम करणाऱ्या मजुरांना ज्या ठिकाणाहून जेवण पुरवले जात होते, ते हॉटेलही शिंदे यांच्या भावाचे आहे. घटनास्थळावरून पोलिसांनी ४३ कामगारांना ताब्यात घेतले, पण सत्ताधाऱ्यांच्या दबावाखाली ४० जणांना सोडून दिले. महाबळेश्वर, पाचगणी येथील शाळा व विद्यालयांच्या परिसरात या अंमली पदार्थांची विक्री सुरू असल्याचेही समोर आले. सातारा जिल्ह्यातल्या अंमली पदार्थाच्या कारखान्यावर मुंबई पोलिसांनी कारवाई केली. यावरून सातारा पोलिस नेमके काय करत होते, हा प्रश्न गंभीरपणे उपस्थित होतो.

**योगायोग नाही, संघटित डाव**

वर्धा, सातारा, धाराशिव, लातूर, ठाणे, पालघर मुंबई राज्याच्या विविध भागांतून अंमली पदार्थांचे कारखाने, सिंथेटिक ड्रग्स, केमिकल्स आणि मोठ्या प्रमाणावरील एमडीसारख्या अंमली पदार्थांचे साठे सातत्याने सापडत आहेत. शहर असो वा गावखेडे, कॉलेज परिसर असो वा औद्योगिक पट्टा सगळीकडे ड्रग्स अगदी खुलेआमपणे उपलब्ध होत आहे. ड्रग्सचा उद्योग असा सहज उभा राहत नाही. त्यासाठी कच्चा माल, रसायने, वाहतूक मार्ग, आर्थिक व्यवहारांचे जाळे आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे पोलीस व राजकीय संरक्षण आवश्यक असते. त्यामुळे राजकीय वरदहस्ताशिवाय महाराष्ट्रात इतक्या मोठ्या प्रमाणावर ड्रग्स तयार केले जाऊ शकत नाही, पोलिसांच्या आशीवार्दाशिवाय त्याची साठवणूक आणि विक्री केवळ अशक्य आहे.

**पोलीस निष्क्रिय की ‘जाणीवपूर्वक आंधळे?’**

अधिवेशन सुरू असताना वर्धा जिल्ह्यात केंद्र सरकारच्या महसूल संचालनालयाच्या गुप्तवार्ता विभागाने शेकडो कोटींचे अंमली पदार्थ पकडले. वर्धा पोलिसांना याची माहिती ही नव्हती. स्थानिक पातळीवर कारखाने चालू असताना, रसायनांची ये-जा होत असताना, वाहतूक सुरू असताना पोलीस ठाण्यांना काहीच कळत नाही. हे मान्य करणे कठीण आहे. त्यामुळे अकार्यक्षमतेपेक्षा संगनमताची शंका अधिक बळावते.

**राजकीय संरक्षण : ड्रग माफियांचा खरा कणा**

महाराष्ट्रातही गेल्या तीन वर्षांपासून ड्रग्सचा उद्योग टिकून आहे, कारण त्याला राजकीय छत्रछाया मिळते आहे, अशी जनभावना तयार झाली आहे. अंमली पदार्थांचे कारखाने उघड होतात, काही आरोपींना अटक होते, टीव्ही, वर्तमानपत्रात बातम्या येतात, पण पुढे काहीच होत नाही? तुळजापुरात ड्रग्स प्रकरणातील आरोपीला भाजपाने नगराध्यक्ष पदाची उमेदवारी दिली. ज्याच्यावर कारवाई व्हायला पाहिजे त्याला राजकीय संरक्षण आणि निवडणुकीची तिकिटे दिली जात आहेत. हा राजकीय नैतिकतेचा संपूर्ण ऱ्हास आहे. अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे युवक आघाडीचा पदाधिकारी विशाल मोरेला ड्रग्स प्रकरणात अटक केली, पक्षाला आपले पदाधिकारी काय करतात हे माहित नव्हते का?

**तरुणाईला उद्ध्वस्त करणारी बेरोजगारी आणि नशा**

तरुणांना नोकऱ्या नाहीत, भरती रखडलेल्या आहेत, परीक्षा लांबणीवर पडतात, परीक्षा झाल्या तरी पेपर फुटतात, खासगी क्षेत्रात संधी कमी आहेत. हताश तरुणांना नोकरीपेक्षा ड्रग्स सहज मिळतात. इतिहास सांगतो, कोणतेही राज्य कमजोर करण्यासाठी त्याची तरुण पिढी उद्ध्वस्त करावी लागते. नशा, गुन्हेगारी आणि हताशा यांचे मिश्रण तयार झाले की, समाज नियंत्रणात येतो. आज महाराष्ट्रातही तोच फॉर्म्युला वापरला जातोय का असा प्रश्न पडल्याशिवाय राहत नाही.

**ड्रग्स म्हणजे गुन्हा नाही, तो राज्याचा मृत्यू असतो**

ड्रग्सचा प्रश्न केवळ कायदा सुव्यवस्थेपुरता मर्यादित नाही. तो सामाजिक, आर्थिक आणि राष्ट्रीय सुरक्षेचा प्रश्न आहे. ड्रग्सचा पैसा गुन्हेगारी टोळ्या पोसतो, कोयता गँग, खंडणी, गोळीबार यांना खतपाणी घालतो. नशेत बुडालेली पिढी उत्पादक राहत नाही; ती हिंसक, हताश आणि अनियंत्रित होते. जेव्हा ड्रग्सचा पैसा राजकारणात शिरतो, तेव्हा निवडणुका विकत घेतल्या जातात, अधिकारी विकत घेतले जातात आणि अखेर लोकशाहीचे अस्तित्व धोक्यात येते.

**‘उडता महाराष्ट्र’ बनवू नका**

ड्रग्सच्या मुद्द्यावर राज्य सरकारकडे ठोस धोरण, निर्णायक कारवाई करण्याची इच्छाशक्ती आणि स्पष्ट राजकीय संदेश देण्याचे धाडस दिसत नाही. ड्रग्सविरोधात लढायचे असेल तर कठोर पावले उचलून माफियांचे कंबरडे मोडावे लागेल. ड्रग्सचा वाढता फैलाव, बेरोजगारी, राजकीय संरक्षण आणि निष्क्रिय प्रशासन हे सारे एकाच भयावह चित्राचे भाग आहेत. महाराष्ट्राला आतून पोखरण्याचा हा सुनियोजित डाव आहे. तरुणांना संधी नाकारणे, नशा सहज उपलब्ध करून देणे, गुन्हेगारी वाढू देणे आणि नंतर ‘कठोरतेच्या’ नावाखाली दडपशाही करणे, हा सत्तेचा जुना, पण घातक पॅटर्न आहे. कोलंबियाने पाब्लो एस्कोबारला उशिरा का होईना, पण अखेर संपवले. मात्र तोपर्यंत त्या देशाने अमाप किंमत मोजली. हजारो लाखो निरपराधांचे मृत्यू, उद्ध्वस्त अर्थव्यवस्था आणि पिढ्यानपिढ्यांची न भरून येणारी हानी. महाराष्ट्रालाही तोच इतिहास पुन्हा अनुभवायचा आहे का? हा प्रश्न आज अत्यंत गांभीयार्ने विचारात घ्यावा लागेल. आजही वेळ हातातून गेलेली नाही. आज जर आवाज उठवला नाही, तर उद्या महाराष्ट्राची ओळख प्रगत, पुरोगामी राज्य म्हणून नव्हे, तर ड्रग माफियांच्या विळख्यात अडकलेला प्रदेश म्हणून होईल. हरितक्रांतीचे प्रतीक असलेला पंजाब गेल्या काही वर्षांत नशा व अंमली पदार्थांमुळे ‘उडता पंजाब’ म्हणून बदनाम झाला. तोच अंधार महाराष्ट्राच्या वाट्याला येऊ देऊ नका. पुरोगामी महाराष्ट्राला ‘उडता महाराष्ट्र’ बनवू नका, हीच राज्यकर्त्यांना कळकळीची विनंती.

# ‘महाराष्ट्रात दबावाचे राजकारण’



**सत्ता आणि नेतृत्वाच्या स्पर्धेत महाराष्ट्रातील प्रमुख राजकीय आघाड्यांमध्ये अंतर्गत मतभेद अधिक तीव्र झाले आहेत. जनतेच्या प्रश्नांपेक्षा एकमेकांना कमजोर करण्याचे राजकारणच पुढे येताना दिसत आहे.**

२३ नोव्हेंबर २०२४ रोजी विधानसभा निवडणुकीचा निकाल जाहीर झाला आणि राज्यात महायुतीला जनतेने पसंती दिली. त्यानंतर ५ डिसेंबर २०२४ रोजी राज्यात महायुतीचे सरकार सत्तेत आले. महायुतीत भाजप मोठा भाऊ असा दावा भाजपकडून करण्यात येत असला तरी घटक पक्ष शिवसेनेच्या कठोर भूमिकेपुढे भाजपला काहीसे नमते घ्यावे लागत असल्याचे वेळोवेळी समोर आले आहे. महायुतीत सहभागी असलेले पक्ष सार्वजनिक मंचावर एकमेकांचे कौतुक करताना दिसले तरी आतल्या पातळीवर महायुतीत अस्वस्थता कायम आहे. निधींचे श्रेय, विकासकामांची प्रसिद्धी आणि नेतृत्वाचा प्रभाव या मुद्द्यांवरून महायुतीतील मतभेद उफाळून येतात. एका बाजूला ‘एकजुटी’चा दावा केला जातो, तर दुसऱ्या बाजूला परस्परांवर दबाव आणण्याचे राजकारण सुरू आहे.

महाविकास आघाडीतही चित्र वेगळे नाही. विचारधारात्मक फरक, नेतृत्वाची स्पर्धा आणि स्थानिक पातळीवरील हितसंबंध यांमुळे अंतर्विरोध वाढले आहेत. निवडणुकांच्या तोंडावर समन्वयाचा सूर लावला जातो; मात्र उमेदवार निवड, प्रचाराची दिशा आणि आघाडीतील समतोल यांवरून वाद निर्माण होत आहेत. ह्यसमान ध्येयह्म असल्याचा दावा असला तरी ते साध्य करण्यासाठीचे मार्ग वेगवेगळे असल्याने आघाडीची धार कमी होत आहे. त्यामुळे महायुती असो वा महाविकास आघाडी दोन्ही पक्षात दबावाचे राजकारण सुरू झाले आहे, हेही तितकेच खरे.

विविध कारणांमुळे महायुतीत धुसफूस वेळोवेळी समोर येत आहे. महायुतीत सगळे आलबेल असे बोलले जात असले तरी महायुतीतच एकमेकांचे पाय ओढण्याचा छुपा खेळ सुरू आहे. महायुतीत भाजप मोठा भाऊ असला तरी शिवसेना व राष्ट्रवादी या दोन्ही पक्षांबरोबर जुळवून घेण्याशिवाय भाजपला पर्याय नाही. एकनाथ शिंदे यांच्या मागणीपुढे भाजपला अनेकदा नमते घ्यावे लागले आहे. त्यामुळे भाजप मोठा भाऊ असला तरी शिंदे सेनेपुढे भाजपची कोंडी होत आहे. त्यामुळे महायुतीतील वाद दिवसागणिक समोर येत आहे. अंतर्गत संघषार्चा सर्वाधिक फटका बसतो तो जनतेच्या प्रश्नांना. महागाई, बेरोजगारी, शेतकरी संकट, शहरी पायाभूत सुविधा, आरोग्य व शिक्षण या मुद्द्यांवर ठोस उपाययोजना अपेक्षित असताना राजकीय शक्ती अंतर्गत वादात अडकली आहे.


आरोप-प्रत्यारोपांच्या राजकारणात धोरणात्मक चर्चा मागे पडत आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील राजकारण नव्या वळणावर चाललेय, असे म्हणणे वावगे ठरणार नाही. महायुती सरकारला राज्यातील जनतेने एक हाती सत्ता स्थापनेचा कौल दिल्याने राज्याला स्थिर सरकार मिळाले, असे वाटले होते. मात्र महायुती सरकारमध्येच एकमेकांचे पाय खेचण्यातच मंत्री व नेतेमंडळी धन्यता मानतात. वादग्रस्त विधाने, हाणामारी करणे जणू महायुतीतील मंत्री व आमदारांच्या सवयीचा तो भागच. राज्यात महायुती सरकारला बहुमत मिळाले असले तरी भाजप मोठा भाऊ आहे.

त्यामुळे महायुतीतील घटक पक्ष अजित पवारांची राष्ट्रवादी आणि एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेच्या मंत्री व आमदारांनी भाजपच्या मनासारखं वागणं याला या दोन्ही घटक पक्षांतील मंत्रीच छेद देत आहेत. त्यामुळे महायुती सरकारमधील अंतर्गत वाद महाराष्ट्राच्या बदनामीस कारणीभूत ठरत आहे. आपल्या मतदारसंघातील समस्यांचे निवारण, पायाभूत सुविधा मिळणे याच मतदारराजाच्या मापक अपेक्षा. मात्र गेल्या काही वर्षांत राजकारणी मंडळींचे राजकारण त्यांच्याच अवतीभोवती सुरू आहे. सत्तेत असो वा नसो एकमेकांची उणीधुणी काढणे यात राजकीय नेते मंडळी धन्यता मानतात. राज्यात महायुतीला जनतेने सत्ता स्थापन करण्याचा कौल दिला. मात्र जनतेचा कौल मिळाल्यानंतर महायुतीतील धुसफूस हळुवार डोके वर काढत आहे. मंत्रिपदांचे वाटप, धोरणात्मक निर्णयात समन्वयाचा अभाव, विकास, योजनांवर श्रेय घेण्यासाठी सुरू असलेली चढाओढ हे सर्व घटक सरकारच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करतात. त्यात आता महायुतीतील नेत्यांची वादग्रस्त वक्तव्य, अंतर्गत वाद यामुळे राज्यातील राजकारणाची भलत्याच दिशेने वाटचाल सुरू झाली आहे. फुले, शाहू, आंबेडकरांच्या विचारांचा महाराष्ट्र आताच्या राजकारणामुळे भरकटत चालला आहे. एकेकाळी सुशासन आणि प्रगतीसाठी ओळखल्या जाणाऱ्या महाराष्ट्राच्या नावावर आता राजकीय अस्थिरतेची छाया पडू लागली आहे.

औद्योगिक गुंतवणूकदार, आंतरराष्ट्रीय कंपन्या व उद्योजक महाराष्ट्रातील दूषित राजकारणामुळे महाराष्ट्र राज्याकडे पाहताना संकोच करत असणार. अंतर्गत वादामुळे प्रशासनाची गती मंदावली असून सामान्य जनतेच्या समस्या दुर्लक्षित राहिल्या आहेत. शेतकरी, कामगार, तरुण या सर्व घटकांना प्रभावी निर्णयांची प्रतीक्षा असतानाही राजकीय स्वाथापीटी जनतेचे प्रश्न अधिकच बिकट होत चालले आहेत. ज्या मतदारराजाच्या मतांवर आपण निवडून आलो याचा विचार सर्वपक्षीय राजकारण्यांनी करणे काळाची गरज बनली आहे. अन्यथा पायाखालची जमीन सरकणार!

महाराष्ट्राचे राजकारण आज इतके विद्रूप झाले आहे की ते ह्यजनतेसाठीह्म न राहता ह्यनेत्यांसाठीह्म झाले आहे. जनतेच्या प्रश्नांची दखल घेण्याऐवजी सत्तेची समीकरणे, मंत्रिपदे, वर्चस्व आणि निधीचे वाटप यावर नेत्यांचा जोर आहे. ग्रामीण भागात दुष्काळ, पूर आणि कर्जबाजारी शेतकऱ्यांची अवस्था बिकट होत असताना मुंबई, पुणे येथील राजकारणी फक्त पत्रकार परिषदेतून आरोप-प्रत्यारोपांचा पाढा वाचतात. राजकारण हे सत्तेसाठी नव्हे तर लोकसेवेसाठी असते, ही जाणीव सत्ताधारी असो वा विरोधकांनी ठेवली पाहिजे. अन्यथा महाराष्ट्रातील जनता जेव्हा प्रश्न विचारायला सुरुवात करेल तेव्हा या नेत्यांच्या पायाखालची जमीनच सरकेल, हे निश्चित आहे.

# अशांत बांगला



१९७१ मध्ये इंदिरा गांधी यांनी युद्ध करून पाकिस्तानची फाळणी करून बांगलादेशची निर्मिती केली. पण तो बांगलादेश आज हिंसाचाराच्या आणि सरकारविरोधी निदर्शनांच्या आगीत होरपळतोय. काल परवा तेथे शरीफ उस्मान हादी या विद्यार्थी नेत्याची हत्या झाली आणि त्यानंतर तेथे जो हिंसाचार उफाळला त्यातून देश सावरलाच नाही. बांगलादेश हा शेख हसीना यांची राजवट होती, तेव्हापर्यंत शांत निदान भासत तरी होता. पण तेथील विद्यार्थ्यांनी उठाव करून राखीव जागांविरोधी आंदोलन केले आणि हसीना यांना भारतात आश्रय घ्यावा लागला. त्यानंतर बांगलादेश कधीही शांत झाला नाही. तेथील हिंदूंना या हिंसाचाराचा सर्वाधिक त्रास होत आहे आणि या हिंदूंचे रीतसर शिरकाण सुरू आहे. तेथील अल्पसंख्याक हिंदूंची हत्या होणे हे चिंताजनक आहे. एका हिंदू इसमाला दंगलखोरांनी मारहाण करून ठार मारल्याची घटना घडली आणि तेथील मोहम्मद युनूस सरकार केवळ बघ्याची भूमिका घेत आहे. हा खरं तर त्या सरकारचा आगीशी खेळ आहे. कारण याचे फारच गंभीर परिणाम होतील आणि युनूस यांना सध्या याची जाणीव नाही. उस्मान हादी यांच्या अंत्यसंस्काराच्या वेळेस प्रचंड प्रमाणात गर्दी जमली होती. यावरून हाच निष्कर्ष काढता येतो की बहुसंख्य जनता ही भारतविरोधी आहे.

बांगलादेशात आता निवडणुका होत आहेत. त्यामुळे परिस्थिती अत्यंत नाजूक आहे. खास करून भारतीयांसाठी. बांगलादेश सरकारविरोधात आंदोलन चरमसीमेवर पोहोचले असताना एका तरुण नेत्याची हत्या करण्यात आली आणि त्याला चिथावणी देणारे बांगलादेशी लोक होते. त्यामुळे अशा कृत्यांना कुणाची मान्यता असणार, हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे. या गदारोळामध्ये दोन मीडिया हाऊसेसची कार्यालये दंगलखोरांनी जाळली आणि कर्मचाऱ्यांना कसेबसे पळून जावे लागले. बांगलादेशात मीडियाची इतकी दारुण अवस्था कधीही नव्हती. अगदी भारत बांगलादेश युद्धातही नव्हती. आता बांगलादेशी लोक भारतीयांविरोधात आपला राग अकारण काढत आहेत, पण ते विसरत आहेत की त्यांना याची शिक्षा पुरेपूर होऊ शकते. भारताने ठरवले तर बांगलादेशला कधीही धडा शिकवू शकतो. पण त्यापेक्षाही हे महत्त्वाचे आहे, की बांगलादेशात ज्या अविचारी शक्तींनी देश हाती घेतला आहे, त्यांना हे माहीत नाही की ही स्थिती देशात अस्थिरता आणू शकते. उस्मान हादीच्या हत्येनंतर देश आता अशांततेने ग्रासला आहे. बांगलागदेशात हिंदूवर अत्याचार आणि त्यांच्या हत्या होण्याच्या घटना घडत आहेत आणि हे चांगले नाही. बागंलादेशसाठी नाही आणि भारतासाठी तर नाहीच नाही. कारण भारत आणि बांगलादेश यांच्यात पूर्वी सलोख्याचे संबंध होते. पण बांगलादेशात हसीना यांची सत्ता गेल्यानंतर तेथे मोहम्मद युनूस यांचे सरकार आले आणि आज देश त्यांच्या हातात आहे की काय अशी स्थिती झाली आहे. बांगलादेश आता पाकच्या वळचणीला जाऊ पाहत आहे आणि हाच धोका आहे. कारण पाक-भारताचे प्रत्यक्षात तर काही वाकडे करू शकत नाही, पण अशा आडवळणाने पाक भारताला त्रास देऊ शकतो. बांगलादेशात आता अल्पसंख्याकांना म्हणजे हिंदूना वाढता धोका निर्माण झाला आहे. ईशनिंदाचे आरोप करणे हे हिंदूच्या छळाचे कारण आहे. हिंदूंची हत्या झाली त्याला हेच कारण होते. त्यामुळे एकेकाळी हिंदू-मुस्लीम सद्भावानेच्या वातावरणात जगत असलेला देश आज परस्परांचा शत्रू बनला आहे. भारत-बांगलादेश यांच्यात एकेकाळी मधुर संबंध होते आणि बांगलादेशाचे निमार्ते शेख मुजीबूर रहमान यांच्याशी तत्कालीन काँग्रेस सरकारचे अत्यंत चागंले सबंध होते. मुळात भारतानेच बांगलादेशाच्या निर्मितीला मदत केली होती. पाकिस्तानी सैनिकांच्या अत्याचारापासून बांगलादेशी नागरिकांना वाचवले होते. मात्र आज तशी परिस्थिती राहिली नाही आणि बांगलादेशाची अवस्था नाजूक झाली आहे. हादीच्या हत्येनंतर युनूस सरकार ग्रेटर बांगलादेशचे स्वप्न पाहत आहे, जे की शक्य नाही. ज्याची व्याप्ती बंगाल, ओडिशा आणि बिहारपर्यंत जाऊ शकते. म्हणूनच युनूस सरकार आता बांगलादेशातील निवडणुका कट्टरपंथीयांच्या जोरावर जिंकू पाहत आहे. भारतात मिनी बांगलादेशीयांची वस्ती ठिकठिकाणी आहे आणि त्यांना कायदेशीर कागदपत्रे आपल्याकडील काँग्रेसनेत्यांनीच मिळवून दिली होती.

बांगलादेशने आता हादीच्या मारेकऱ्यांना पकडण्यासाठी २४ तासांचा अल्टिमेटम दिला असला तरीही त्याच्या मारेकऱ्यांचा शोध लागलेला नाही, त्यामुळे बांगलादेश हादीच्या हत्येच्या आगीत अजूनही जळतच रहाणार आहे. आता यातून मार्ग काढण्यासाठी युनूस सरकारपुढे एकच मार्ग आहे, तो म्हणजे शांतता आणी सलोख्याचे आवाहन करणे आणि भविष्यात अशी भडक हिंसा घडणार नाही याची काळजी घेणे. पण युनूस सरकार त्याबाबतीत कसे वागते हे पाहावे लागेल. या दंगलीत हल्लेखोरांनी दैनिकावर हल्ले केले. बांगलादेश अजूनही प्रचंड मागास आहे. त्यामुळे अर्धी लोकसंख्या इंटरनेटपासून वंचित आहे. पण अशा लोकांना भावना भडकावणे सोपे असते आणि तेच बाांगलासरकारने केले. त्यातही भारताच्या विरोधात भडकावण्याने लोक खरेखोट्याची शहानिशा न करता सरकार सांगतील त्या बाबींवर विश्वास ठेवतात. त्याचा फटका भारताला बसला. ज्या दैनिकांची कार्यालये जाळली त्यांच्या संपादकानी हा दिवस स्वतंत्र पत्रकारितेसाठी काळा दिवस असल्यचे म्हटले आहे. देशाची प्रतिमा मलिन होईल असे कृत्य कुणीही करू नये पण युनूस सरकारला धर्मांध शक्तींपुढे न झुकता कारवाई करावी लागेल, तरच बांगलादेश या संकटातून बाहेर पडेल. बांगलादेश हिंसाचारात कुणाचा हात आहे आणि कुणाचे अंतस्थ हेतू आहेत हे कळण्यासाठी घटनेची चौकशी होऊन दंगेखोर समोर आले पाहिजे ही प्रत्येक देशवासीयाची इच्छा आहे. त्याला युनूस यांनी प्रतिसाद दिला पाहिजे. त्यांचे सरकार लेचेपेचे नाही हे त्यांनीच दाखवून दिले पाहिजे. अन्यथा त्यांची गत खलिदा झिया यांच्यासारखी होईल. या गोंधळाचा उपयोग करून मोहम्मद युनूस कदाचित निवडणुका पुढे ढकलतील किंवा कट्टरपंथीयांची सहानुभूती मिळवतील. तसे झाले तर लोकशाहीचा पराभव होईल.




# फास्टफूड खाताय तर व्यायाम करा...नाही तर

फास्ट फूड खाणाऱ्यांची संख्या वाढलीय. भूक लागली म्हणून पिज्झा बर्गर खाल्ला यापेक्षा फॅशन म्हणून आजकाल पिज्झा बर्गर आणि फ्रेंच फ्राईज खाल्ल्या जातात. पण फास्ट फूड खाल्ल्यानं तरुणाईत लठ्ठपणा वाढतो. जर तुम्हाला फास्ट फूड खाऊन त्याचे दुष्परिणाम नको असतील तर तेवढा व्यायामही करणं गरजेचं आहे. इंग्लंडमधील लॉफबर्ग विद्यापीठानं केलेल्या एका अभ्यासाअंती तुम्ही फास्ट फुड खाल्ल्यावर किती व्यायाम करायला हवा याची यादीच जाहीर केली.

तुम्ही जर एक पिज्झा खाल्ला तर त्यातील कॅलरी बर्न करण्यासाठी तुम्ही ४ तास धावलं पाहिजे. तुम्ही ५०० मिली पिनट बटर खाल्ल्यावर अडीच तास धावलं पाहिजे. ११० ग्रॅम चॉकलेट खाल्ल्यावर १ तास धावलं पाहिजे.

चिकन सँडविच खाल्ल्यावरही तुम्ही एक तास धावलं पाहिजे. १ लिटर कोल्ड ड्रिंक प्यायल्यावर ३० मिनिटं धावायला पाहिजे. चिप्स खाल्ल्यावर २० मिनिटं धावणं गरजेचं आहे. एक कप चहा प्यायल्यानंतर ६ मिनिटं चालणं गरजेचं आहे.

हल्लीच्या तरुणाईसाठी फास्ट फूड खाणं खूप सोप्पं आहे. पण व्यायामाला त्यांच्याकडं वेळ नाही.

फास्ट फूड खाल्लं तर किती व्यायाम करावा हा तक्ता दिसायला बरा वाटतो. पण तो कुणालाही पाळता येणार नाही. त्यामुळं शक्यतो फास्ट फूडच टाळावं असा सल्ला डॉक्टर देतात.

फास्ट फूडमुळे लोकांमध्ये लठ्ठपणा वाढत चाललाय. सध्या जगात १५ कोटी मुलं आणि तरुणाई लठ्ठपणाच्या विळख्यात सापडलीय.

फास्ट फूड खाणं असंच सुरू राहिलं तर येत्या १० वर्षात लठ्ठपणाच्या विळख्यात जवळपास २५ कोटी लोकं सापडतील अशी भीती व्यक्त केली जातेय. त्यामुळं शक्यतो फास्ट फूडपासून लांबच राहा.

# घरच्या घरी बदामापासून बनवा वॉटरप्रुफ आयलायनर



तुम्हाला घरच्या घरी काही गोष्टी करुन पाहायला आवडत असतील तर तुमच्यासाठी आम्ही आज खास एक उक्त रेसिपी आणली आहे. तुमच्या डोळ्यांचे सौंदर्य वाढवणाऱ्या आयलायनरचा वापर करायला तुम्हाला आवडत असेल तर तुम्ही घरच्या घरी आयलायनर बनवू शकता तेही वॉटरप्रुफ... हे वॉटरप्रुफ्र आयलायनर बनवण्यासाठी आपण करणार आहोत बदामाचा वापर...मग आता हे आयलायनर कसे बनवायचे ते जाणून घेऊया.

घरच्या घरी बदामाचे आयलायनर बनवण्यासाठीची कृती - साधारण एक वाटीभर बदाम तुम्ही घेतले तर तुम्हाला यापासून भरपूर आयलायनर बनवता येईल. यासाठी तुम्हाला एखादे असे भांडे लागेल जे काळे झाले तरी तुम्हाला फरक पडणार नाही. बदाम छान कुटून घ्या. एका भांड्यात बदाम घेऊन त्यामध्ये जाळ पेटवा.(तुम्ही एक एक बदामही जाळून घेऊ शकता. पण त्यामध्ये वेळ लागतो.) बदामातून छान धूर येऊ लागल्यानंतर आणि ते काळे होईपर्यंत तुम्हाला ते काळे होऊ द्यायचे आहेत. बदाम छान खरपूस जळाल्यानंतर तुम्हाला ते बारीक वाटून घ्यायचे आहेत. असे करताना तुमच्या बदामाचे तेल वर येईल.

त्यामुळे त्यामध्ये थोडा ओलसरपणा नक्कीच येईल. पण याला अधिक स्मुथ आणि छान करण्यासाठी तुम्ही त्यामध्ये अगदी थोडसे ॲलोवेरा जेल घाला. असे करताना तुम्ही ते फार पातळ होणार नाही याची काळजी घ्या तयार आयलायनर तुम्हाला ब्रशच्या मदतीने लावता येईल. हे आयलायनर जर तुम्ही नीट वापरले तर ते चांगले टिकू शकते. आयलायनरमध्ये बदामाचे तेल असल्यामुळे ते आयलायनर निघत नाही. ते छान टिकून राहते आणि त्याचा कोणताही साईड इफेक्ट होत नाही. तयार आयलायनर एका एअरटाईड कंटेनरमध्ये भरुन ठेवा. तुम्ही हे आयलायनर फ्रिजमध्ये ठेवले तरी तुम्हाला चालू शकेल.

आयलायनर जास्त काळ टिकवण्यासाठी तुम्ही वापरत असलेला ब्रश कायम स्वच्छ वापरा. आता तुम्ही आयलायनर वापरताना किंवा करताना एका गोष्टीची काळजी घ्यायला हवी ते म्हणजे आयलायनर चांगले बारीक वाटले गेले पाहिजे. कारण आयलायनर स्मुथ आणि चांगले लागले गेले नाही तर ते अजिबात चांगल दिसत नाही. तुम्ही याचा वापर काजळ म्हणून ही करु शकता. हे काजळ ऑरगॅनिक असल्यामुळे तुम्हाला त्याचा त्रास होत नाही. तुम्ही तेलाचा उपयोग करुन हे काजळ अगदी आरामात काढू शकता. तुम्हाला याचा कोणताही त्रास होणार नाही.

# ‘ही’ लक्षणं दिसली तर वेळीच सावध व्हा
# लिव्हर खराब होण्याचे असू शकतात संकेत



शरीराचं कार्य सुरळीत व्हावं यासाठी अनेक अवयव महत्त्वाची भूमिका बजावतात. अशातच लिव्हर शरीराचा एक महत्त्वपूर्ण भाग असून त्याला यकृत असंही म्हटलं जातं. जर लिव्हरचं आरोग्य बिघडलं तर मृत्यू होण्याचाही धोका संभवतो. लिव्हरचं काम पचनक्रियेशी निगडीतही असतं. लिव्हरचं वजन १.३ ते १.६ किलोग्राम एवढं असतं. लिव्हर शरीरातील विषारी घटक पित्ताच्या स्वरूपात फिल्टर करण्याचं काम करतं आणि मल किंवा मूत्र स्वरूपात शरीरातून बाहेर टाकले जातात. लिव्हर शरीरामध्ये जवळपास ३०० पेक्षा अधिक कामं करतं. लिव्हर रक्तामध्ये साखरेचं प्रमाण नियंत्रणात करण्याचं काम करतो. लिव्हरचं एक कार्य शरीरात रक्त तयार करणं हेदेखील आहे.

**या लक्षणांकडे दुर्लक्षं करू नका**

- **त्वचेचा रंग पिवळा होणं** : लिव्हरचं काम बिघडतं तेव्हा याचा परिणाम त्वचेवर दिसून येतो. तसेच डोळ्यांमध्येही पिवळेपणा वाढतो. त्वचेचा रंग पिवळा पडणं, लघवीचा रंग पिवळा होणं यांसारखी लक्षणं दिसून आली तर वेळीच सावध व्हा.
- **उलटीमधून रक्त पडणं** : जेव्हा सतत मळमळ होणं किंवा उलट्या येणं यांसारख्या समस्या वाढतात. त्यावेळी लिव्हरची समस्या असण्याती शक्यता असते. तसेच उलटी करताना त्यातून रक्त पडलं तर त्याकडे अजिबात दुर्लक्ष करू नका. तज्ज्ञांचा सल्ला घ्या.
- **हाता पायांना सूज येणं** : लिव्हरचं आरोग्य बिघडतं त्यावेळी पोटाच्या खालच्या बाजूला सूज जाणवू लागते. तसेच हाता-पायांनाही सूज येते. जर तुम्हालाही ही समस्या जाणवत असेल तर दुर्लक्ष न करता डॉक्टरांचा सल्ला घेणं आवश्यक असतं.
- **थकवा जाणवणं** : अनेकदा आपल्याला थकवा येत असेल तर हेदेखील लिव्हर खराब होण्याचे संकेत असू शकतात. थकवा येण्याची इतरही कारण असू शकतात. त्यामुळे योग्य कारण ओळखण्यासाठी डॉक्टरांचा सल्ला घ्या.
- **जेवण बेचव लागत असेल तर** : जेवणाची इच्छा होत नसेल किंवा चव लागत नसेल तर ही गंभीर समस्या असू शकते. तसेच तोंडातून दुर्गंधी येत असेल तर हेदेखील लिव्हर खराब होण्याचं लक्षण असू शकतं.

# चेहऱ्यानुसार करा इअररिंग्जची निवड या आहेत टिप्स

महिला सुंदर दिसण्यासाठी विविध आपली सुंदरता वाढवण्यासोबतच आपल्या श्रृगांवरही लक्ष देतात ज्यामुळे त्या आकर्षक दिसतात. यापैकी एकच म्हणजे कानातले ज्यामुळे चेहऱ्याची सुंदरता अधिक वाढते. मात्र हे कानातले आपल्या चेहऱ्याला सूट होण्यासारखे घातले तर चांगेल वाटतात नाहीतर ते चेहऱ्याची सुंदरता बिघडवतात. यासाठी जाणून घ्या आपल्या चेहऱ्याच्या अनुसार कोणत्या प्रकारचे कानातले तुम्ही घातले पाहिजेत.

- **चौकोनी चेहरा** : जर तुमचा चेहरा चौकौनी आहे तर अशा चेहऱ्यावर गोल आणि टियर ड्रॉप इअरिंग्स शोभून दिसतात. चौकोनी चेहऱ्यावर मोठे स्टोन्स असलेले इअररिंग्च्या ऐवजी छोटे छोटे स्टोन्स असलेले इअररिंग्ज वापरा.
- **हार्ट आकाराचा चेहरा** : अशा चेहऱ्याच्या व्यक्तींनी नेहमी लांब आण घुमावदार इअररिंग्ज निवडावे. या मुळे चेहऱ्याची सुंदरता अधिक वाढते. अभिनेत्री प्रियंका चोप्राचा चेहरा असा आहे.
- **गोलाकार चेहरा** : गोलाकार चेहरा असलेल्या महिलांनी चेहरा भरलेला दिसेल असे कानातले घालू नये. कमी लांब असलेले ड्रॉप इअररिंग्ज अशा प्रकारच्या चेहऱ्याला सूट करतात. गोल चेहऱ्याच्या महिलांनी गोलाकार डिस्क असलेले कानातले घालू नयेत.
- **डायमंड चेहरा** : डायमंड आकाराच्या चेहऱ्यावर लांब आणि कर्व्हस असलेले कानातले चांगले वाटतात. जास्त स्टोन असलेले आणि हूप इअररिंग्जही या प्रकारच्या चेहऱ्यावर चांगले दिसतात.
- **अंडाकार चेहरा** : अभिनेत्री कतरिना कैफचा चेहरा अंडाकार आकाराचा आहे. या चेहऱ्यावर सगळ्या प्रकारचे इअररिंग्ज चांगले वाटतात. जास्त लांबीचे इअर रिंग्ज या चेहऱ्यावर चांगले वाटत नाहीत.
- **लांब चेहरा** : ज्यांचा चेहरा लांब असतो अशा व्यक्तींना जास्त लांबीचे इअररिंग्ज चांगले वाटत नाहीत. या चेहऱ्यावर छोटे स्टड अथवा ड्रॉप इअर रिंग्ज चांगले वाटतात. यामुळे चेहरा रूंद वाटतो आणि एक वेगळाच लूक येतो.



# तुमचेही मुलं दूध पित नसतील तर करा हे उपाय



आजकाल प्रत्येक आई मुलाच्या दूध न पिण्याच्या सवयीमुळे हैराण असते. तिसऱ्या वर्षापर्यंत आवडीने दूध पिणारी मुले नंतर मात्र दूध पिण्यास टाळाटाळ करू लागतात. जी मुले स्तनपान किंवा बाटलीने आवडीने दूध पितात.

ती नंतर पेल्याने दूध पिण्यास नकार देतात. एकीकडे छोटी मुले आवडीने दूध पितात तर जसंजशी ती मोठी होऊ लागतात ती दूधाचा ग्लास तोंडालाही लावत नाहीत. ज्यामुळे त्यांना पुरेशी पोषक तत्त्वे मिळत नाहीत. परिणामी शरीरात कॅल्शिअम आणि आर्यनची कमतरता निर्माण झाल्यामुळे शारिरीक आणि मानसिक विकास हळू गतीने होऊ लागते.

अनेक मातांना यामुळे मुलांच्या पोषणाबाबत चिंता वाटू लागते. कारण वाढत्या वयात मुलांनी दूध पिणे खूप गरजेचे आहे. पण जर तुमचे मुलंही दूध पिण्यास टाळाटाळ करत असेल तर पुढील उपाय करून पाहा.

१. **फ्लेवर्ड दूध** : अनेकदा मुलांना दूधाची चव आवडत नाही. त्यामुळे ते दूध पिण्यास नकार देतात. अशावेळी तुम्ही दूधामध्ये चॉकलेट किंवा स्ट्रॉबेरी फ्लेवर घालून त्यांना देऊ शकता. मुलं असे फ्लेवर्ड दूध लगेच पितील.

२. **नाश्त्याआधी दूध** : जेव्हा मुलं उपाशी असते तेव्हा त्यांना तुम्ही दूध प्यायला द्या. सकाळी रिकाम्या पोटी असलेली मुलं दूध लगेच पितात. तसेच खेळता खेलता मुलांना दूध प्यायला देण्याचा प्रयत्न करा.

३. **आवडत्या कार्टूनचा ग्लास** : तुमच्या मुलांना जे कार्टून आवडत असेल त्याचा मग किंवा कप आणून त्यात दूध प्यायला द्या. मग पाहा मुलं पटकन दूधाचा ग्लास रिकामा करतील.

४. **मिल्कशेक बनवून द्या** : तुम्ही विविध प्रकारचे मिल्कशेक्स बनवूनही मुलांना प्यायला देऊ शकता. ज्या ऋतूत जी फळे उपलब्ध असतील ती घालून मिल्कशेक बनवा. यामुळे मुलांना दूधाचे आणि फळाचे दोन्ही पोषण मिळेल.

जर

**वरील उपाय करूनही मुलांनी दूध पिण्यास नकार दिला तर...**

- संत्र्याचा रस द्या
- पोळी खाऊ घाला
- त्यांच्या आहारात सोयाबीनचा समावेश करा
- ताज्या फळांचा मिल्कशेक करून द्या.
- भाज्यांचे सूप करून ते द्या
- सॅलड किंवा कोशिंबीरी खाण्याची सवय लावा.
- बदाम आणि चण्यांचा आहारात समावेश करा.

प्रोटीनचे सेवन आपल्यासाठी का आवश्यक आहे आणि त्याचे स्त्रोत शेवटी मुलांनी कितीही नखरे केले तरी आपले कर्तव्य आहे की, त्यांना युक्ती करून दूध देणे. मग तुम्हीही वरील उपाय नक्की करून पाहा.

# गर्भाशयाचा कॅन्सर आता भूतकाळात जाणार?
# प्रभावी लस सापडल्याचा दावा



कॅन्सर म्हटलं की सगळ्यांच्या काळजाचा ठोका चुकतो. जगभरात एवढं संशोधन झालं मात्र या आजारावर रामबाण उपाय सापडला नाही. आता सगळ्याच शास्त्रज्ञांना आशेचा किरण सापडला आहे. काही प्रगत देशांमध्ये केलेल्या संशोधनात लर्ेंल्लढंस्त्र’’ङ्कें ९१४२ म्हणजेच ल्ढ९ ही लस गुणकारी ठरल्याचा दावा केला आहे. जगप्रसिद्ध ‘लॅन्सेट’ या मासिक एक संशोधन अहवाल देण्यात आला आहे त्याचा संदर्भ देत हा दावा केला आहे.

**कॅन्सर होण्याचे कारण आणि त्यावर उपाय काय?**

- रात्री उशिरा जेवणे करण्याच्या सवयीमुळे पोटाचा कॅन्सर होऊ शकतो.
- जेवणानंतर फळे खाणे टाळावे... जेवायच्या आधी खाल्लेली चालेल.
- मासिकपाळीच्या वेळी चहा पिणे टाळावे.
- अनुशापोटी टमाटे खाऊ नयेत.
- रोज सकाळी उठून एक ग्लास पाणी प्यावे. ब्लॅडर स्टोन होत नाहीत.
- झोपण्यापूर्वी ३ तास आधी जेवावे
- अतिशय गरम पोस्ट खाऊ नयेत.
- झोपताना जवळ मोबाईल ठेवू नये.
- ब्लॅडर कॅन्सर टाळण्यासाठी दिवसातून किमान १० ग्लास पाणी प्यावे.
- दिवसा जास्त तर रात्री कमी पाणी प्यावे.
- इन्सोमॅनिया आणि गॅस प्रॉब्लेम टाळण्यासाठी दिवसातून २ पेक्षा जास्त कॉफी पिऊ नये
- तेलकट कमी खावे. कारण असे जेवण पचण्यासाठी ५ ते ७ तास लागतात. आणि त्यामुळे थकवा येऊ शकतो.
- सायंकाळी ५ नंतर कमी खावे.
- केळी, द्राक्षे, स्पिनीच, भोपळा, पिच अशाप्रकारची सहा फळे खावीत.
- कमी झोप ही आपल्या मेंदूस अपायकारक असते म्हणून किमानपक्षी दिवसात आठ तास तरी झोप घ्यावी.
- सुंदर स्वास्थ्यासाठी दुपारी १ तास वामकुक्षी करावी.
- टमाटे वाफवून शिजवून खावेत. कच्चे टमाटे खाऊ नयेत.
- गरम लिंबूपाण्यामुळे दिघार्युष्य लाभते.
- कॅन्सरच्यापेशी नष्ट होतात.
- रोज गरम लिंबूपाणी प्यावे.
- थंड लिंबूपाण्यात फक्त व्हिटॅमिन सी असते.

कॅन्सर नष्ट करण्याची क्षमता नसते. हे संशोधनातून स्पष्ट झाले आहे. गरम लिंबूपाणी हे कॅन्सर वरचा रामबाण उपाय ठरले आहे. कारण ते फक्त कॅन्सरच्यापेशीच नष्ट करते. बाकी पेशींना अपाय पोहचवत नाही. आणि लिंबातील सायट्रिक एसिड, पॉलिफिनॉल उच्च रक्तदाब कमी करते. मुख्य रक्तवाहिन्यातील रक्तप्रवाह सुरळीतपणे चालतो. आणि रक्ताच्या गुठळ्या कमी करतो. दरम्यान, श्रीमंत देशांमध्ये गर्भाशयाच्या कॅन्सरचं प्रमाण कमी असते. कारण निदान झाल्यावर लगेच त्यावर अत्याधुनिक उपचाराच्या सोई तिथे उपलब्ध असतात. मात्र ही सोय गरीब आणि विकसनशील देशांमध्ये उपलब्ध नसते. त्यामुळे अशा देशांमध्ये ही लस अतिशय प्रभावी ठरू शकते असा दावा या संशोधनात करण्यात आल आहे. गरीब देशांमध्ये दरवर्षी ३ लाख महिलांचा गर्भाशयाच्या कॅन्सरमुळे मृत्यू होते. ही लस दिल्यास त्याचे प्रमाण लक्षणीय कमी होऊ शकते असा या शास्त्रज्ञांचा दावा आहे.




# उच्च रक्तदाब नियंत्रणात आणण्यासाठी या पाच अन्नपदार्थांचं करा सेवन

धकाधकीच्या आयुष्यात हल्ली बहुतांश जणांना उच्च रक्तदाबाचा त्रास सहन करावा लागत आहे. उच्च रक्तदाबाचा त्रास उद्भवण्याची कारणे वेगवेगळी असतात. कामाचा ताण, बदलती जीवनशैली आणि खाण्यापिण्याच्या वाईट सवयी यामुळे उच्च रक्तदाबाचा त्रास निर्माण होऊ शकतो. योग्य वेळीच उच्च रक्तदाब आजारावर औषधोपचार न केल्यास हृदय रोगांना आयते निमंत्रण मिळते. या समस्येवर उपाय करताना आहारामध्ये बदल केल्यास तुम्हाला योग्य मदत होईल. आहारातील काही घटक कमी-जास्त केल्यास उच्च रक्तदाबावर नियंत्रण मिळवणं शक्य आहे.

१. आहारामध्ये हिरव्या पालेभाज्यांचा समावेश करावा. हिरव्या पालेभाज्या शरीरातील अतिरिक्त सोडिअमपासून आपल्याला मुक्तता मिळवून देण्याचं काम करतात. पालेभाज्यांमध्ये भरपूर प्रमाणात पोषकतत्त्वांचा समावेश असतो. ज्यामुळे तुमच्या संपूर्ण शरीराला आरोग्यदायी फायदे मिळतात. उच्च रक्तदाबावर नियंत्रण मिळवण्यासाठी आपल्या आहारात पालक, कोबी, कारले या भाज्यांचा समावेश करावा.

२. दिवसाची सुरुवात तुम्ही ओट्स खाऊन करत असाल तर हा पर्याय तुमच्या आरोग्यासाठी सर्वाधिक चांगला आहे. ओट्स शरीरासाठी अतिशय पोषक असे आहेत. ओट्समध्ये फायबरचे प्रमाण अधिक असते. तर फॅट्स कमी प्रमाणात असतात. ही पोषकतत्त्वे आरोग्य आणि ब्लड प्रेशर दोन्हींचा त्रास कमी करण्यासाठी लाभदायक आहेत. ओट्सच्या सेवनामुळे वजन देखील कमी होण्यास मदत होते. शिवाय, ओट्समध्ये सोडिअमची मात्रा देखील कमी असते, यामुळे उच्च रक्तदाबाचा त्रास कमी होतो.

३. कीवी फळ आपल्या आरोग्यासाठी फायदेशीर आहे. दिवसभरात तीन कीवी खाल्ल्यास हाय ब्लड प्रेशर नियंत्रणात राहण्यास तुम्हाला चांगली मदत मिळेल. एवढंच नाही तर कीवी त्वचेसाठी देखील उत्तम फळ आहे. या फळामुळे शरीराची पचन प्रक्रिया आणि रोगप्रतिकारक शक्ती देखील सुधारते.

४. स्वयंपाकातील मसाल्यांचाही आहारात वापर करून तुम्ही उच्च रक्तदाबाचा त्रास नियंत्रणात आणू शकता. यापैकीच एक पर्याय म्हणजे लसूण. हाय ब्लड प्रेशरचा त्रास लसूणच्या सेवनामुळे कमी होतो. सकाळच्या सुमारास पाण्यासोबत कच्चं लसूण खावे. उच्च रक्तदाब नियंत्रणात आणण्यासाठी तुम्ही विविध अन्नपदार्थांमध्येही लसूणचा समावेश करावा.

५. दह्याच्या सेवनामुळे हाय ब्लड प्रेशर नियंत्रणात आणण्यास मदत होऊ शकते. हा त्रास कमी करण्यासाठी आहारामध्ये दह्याचा समावेश करावा. यामध्ये कॅल्शिअमचं प्रमाण अधिक असते आणि दही रक्तदाबाची पातळी नियंत्रणात आणण्याचं काम करतं. दही आपल्या शरीरासाठी लाभदायक आहे. दह्यामुळे आपल्याला अनेक आरोग्यवर्धक फायदे मिळतात.

# कॅन्सरच्या दुष्परिणामांचा महिलांना अधिक असतो धोका



पोटाचा कॅन्सर इतर कॅन्सरप्रमाणेच जीवघेणा असतो. पुरूष असो वा महिला सर्वांसाठीच कॅन्सर हा घातक ठरू शकतो. मात्र अशात एका रिसर्चमधून दावा करण्यात आला आहे की, ज्या महिलांना अन्न नलिकेचा किंवा पोटाचा कॅन्सर असतो त्या महिला पुरूषांच्या तुलनेत अधिक काळ जगतात. सोबतच त्यांना किमोथेरपी दरम्यान उलटी, मळमळ व डायरियाचा सुद्धा त्रास होतो. या रिसर्चमुळे पोटाच्या कॅन्सरने पीडित रूग्णांचं चांगल्याप्रकारे परीक्षण करण्याचा फायदा मिळेल. सोबतच या रिसर्चच्या परिणामांच्या आधारावर आता सहजपणे हे समजून घेता येईल की, लोकांमध्ये कॅन्सरच्या दुष्परिणामांचा अधिक धोका असतो. पोटाच्या खालच्या भागात खूपसाऱ्या पेशी असतात आणि जेव्हा या कोणत्याही अडचणीशिवाय वाढू लागतात तेव्हा कॅन्सरचं रूप घेतात. ब्रिटनच्या रॉयल मार्सडेन हॉस्पिटलच्या अवनी अथोदा ‘या रिसर्चच्या मुख्य लेखिका आहेत. त्या म्हणाल्या की, 'आपण अन्न नलिका आणि पोटाच्या कॅन्सरच्या उपचारासाठी स्ट्रॅंडर्ड ट्रीटमेंटचा वापर केला जातो. पण या रिसर्चमधून महिला आणि पुरूष रूग्णांमध्ये दोन वेगवेगळे फरक बघायला मिळतात. एकतर हा की, किमोथेरपीदरम्यान कोणत्या प्रकारची प्रतिक्रिया देतात आणि दुसरा हा की, कॅन्सरच्या उपचारानंतर ते किती काळ जगतात. त्यामुळे महिलांच्या संदर्भात उपचारादरम्यान पोट आणि अन्न नलिकेच्या कॅन्सरच्या थेरपीने होणारे साइड इफेक्ट्सबाबत त्यांना जागरूक करणे आणि सल्ला देणे महत्त्वाचं ठरू शकतं'. या रिसर्चसाठी वैज्ञानिकांनी मुख्य रूपाने यूकेमध्ये आधीच प्रकाशित चार रॅंडम पद्धतीने केल्या गेल्या परिक्षणांमधून आकडेवारी घेतली आणि त्यांचं विश्लेषण केलं. हा रिसर्च त्यांनी ३ हजार रूग्णांवर केला. ज्यातील २, ६६८ रूग्ण पुरूष होते तर ५९७ महिला होत्या. वैज्ञानिकांना यातून आढळलं की, पुरूष रूग्णांच्या तुलनेत महिला रूग्णांना उलटी, मळमळ आणि डायरियासारख्या समस्यांचा अनुभव येतो. सोबतच हा निष्कर्ष काढण्यात आला की, महिला रूग्ण पुरूष रूग्णांच्या तुलनेत अधिक काळ जगतात. हा रिसर्च अमेरिकन सोसायटी ऑफ क्लिनिकल ऑनकोलॉजीमध्ये सादर करण्यात आला.

